दिव्य मराठी

धाराशिव जिल्हा 21-08-2024

सुरक्षा • ऑनलाइन गुन्हेगारी सतर्कता अभियानात तज्ज्ञ प्रतीक्षा पांगे यांचे आवाहन

# सायबर गुन्हेगारांच्या टोळयांचे लक्ष्य ठरत आहेत आता शालेय विद्यार्थी..

## भारत विद्यालयात लहान मुलांनी काळजी घेण्याच्या सूचना

प्रतिनिधी | उमरगा

सध्या वाढती सायबर गुन्हेगारी ही चिंतेती बाब आहे.सर्वात धक्कादायक म्हणजे सायबर गुन्हेगारांच्या टोळ्या आता विद्यार्थ्यांना जाळ्यात अडकवतायत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्हेगारीबाबत जनजागृती होण्यासाठी सायबर तज्ञ प्रतीक्षा पांगे क्विक हील फाउंडेशन व राजश्री शाहू कॉलेज महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शाळा- कॉलेजमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती मोहीम राबवत येत आहे.

भारत शिक्षण संस्था संचलित शहरातील भारत विद्यालयात मंगळवारी (२०)ऑनलाइन गुन्हेगारी सतर्कता अभियान आयोजित करण्यात आलेले होते. लहान मुलांनी आपली सायबर सुरक्षा कशी करावी याबाबत बोलताना प्रतिक्षा पांगे म्हणाल्या की, एखादा युजर्स आठव्या वर्गात असेल. तर दुसरा मी ही तुझ्याच वयाचा आहे. तुझे आई-वडील काय करतात, आर्थिक उत्पन्न काय आहे, तुमचे पालक परदेशात गेले होते का,कार कोणती आहे अशी माहिती गोळा करण्यात येते. व्हॉट्सअपवर नंबर शेअर होतात. समोरच्या व्यक्तीकडून संपूर्ण माहिती घेतात. यामुळे गुन्हेगारी करण्यास मदत होते. हळूहळू वैयक्तिक माहिती घेतात. लहान मुलांना जाळ्यात ओढले जाते, जर ऑनलाईन फसवणूक झाल्यास नॅशनल हेल्पलाइन नंबर १९३०किंवा cybercrime.gov.in येथे तक्रार नोंदवावी असे आवाहन त्यांनी यप्रसंगी बोलताना केले.

या कार्यक्रमासाठी शिक्षिका सुनीता फडे अध्यक्षस्थानी होत्या. मुख्याध्यापक शाहूराज जाधव, पर्यवेक्षक संजय देशमुख आदी उपस्थित होते. सहशिक्षक व्यंकट गुंजोटे यांनी सुत्रसंचालन करून आभार मानले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



ऑनलाईन गुन्हेगारी सतर्कता याबाबत बोलताना प्रतीक्षा पांगे.

### पुरेशी जागरूकता नाही

त्या पुढे म्हणाल्या की, सायबर हल्ले व फसवणुकीच्या घटना शोधताना पोलीस अपयश चिंताजनक आहे. सध्याच्या काळात बहुतांश आर्थिक व्यवहार ऑनलाईन होत आहेत. मात्र जागरुकता नसल्याने गैरफायदा सायबर गुन्हेगार घेत असल्याचे दिसून येते.तसेच वाढता संगणक, मोबाईल अन इंटरनेटचा वापर आणि त्या अनुषंगाने सायबर गुन्ह्यांमध्ये होणारी वाढ ही चिंताजनक बाब असून अशा गुन्ह्यांना तरुणांबरोबरच प्रौढ व्यक्ती, वयोवृद्ध नागरिक देखील कळत नकळत बळी पडत आहेत. याबाबत पुरेशी जागरुकता नसल्याचा गैरफायदा सायबर गुन्हेगार घेत असल्याचे विविध दाखल झालेल्या गुन्ह्यांवरून दिसून येते. विद्युत बीले भरताना, बँकेचे केवायसी करण्याच्या बहाण्याने, ऑनलाईन खरेदी करताना व यू ट्यूबला लाईक करण्याचे टास्क देऊन आर्थिक फसवणूक केली जात आहे,असे पांगे यांनी सांगितले.